दै. ~~पुण्यनगरी~~ सत्यप्रभा

# एका चोरट्याला पकडून स्थानिक गुन्हा शाखेने ३ लाख ७२ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला



नांदेड(प्रतिनिधी)-स्थानिक गुन्हा शाखेने एका चोरटयाला पकडून त्याने चोरलेल्या ४८ ग्रॅम सोन्याचे दागिणे आणि २०० ग्रॅम चांदीचे दागिणे, रोख रक्कम २१ हजार रुपये असा एकूण ३ लाख ७३ हजार २०० रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. या चोरट्याने सन २०१६ मध्ये विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक खून पण केला होता. त्याप्रकरणात त्याला अद्याप अटक झालेली नाही.

पोलीस जनसंपर्क विभागाने दिलेल्या माहितीनुसार स्थानिक गुन्हा शाखेने संतोष उर्फ चॉकलेट्या बापूराव भोसले(४५) रा.कुरळा हा.मु. वहाद ता.कंधार जि.नांदेड यास ताब्यात घेतले. त्याने मुखेड पोलीस ठाण्याअंतर्गत तीन चोऱ्या केल्या आहेत, देगलूर आणि कंधार पोलीस ठाण्याच्या अंतर्गत प्रत्येकी १ अशा चोऱ्या केल्या आहेत. या पाच चोऱ्यात चोरीला गेलेल्या ऐवजापैकी ४८ ग्रॅम सोन्याचे दागिणे, २०० ग्रॅम चांदीचे दागिणे आणि रोख रक्कम २१ हजार रुपये असा एकूण ३ लाख ७३ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल स्थानिक गुन्हा शाखेने हस्तगत केलेला आहे. या चोरट्याला पुढील तपासासाठी पोलीस ठाणे मुखेड यांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

पोलीस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधिक्षक अबिनाशकुमार, डॉ.खंडेराय धरणे यांनी या कामगिरीसाठी स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरिक्षक उदय खंडेराय, सहाय्यक पोलीस निरिक्षक रवि वाहुळे, पोलीस अंमलदार गुंडेराव कर्ले, संजीव जिंकलवाड, देविदास चव्हाण, रणधिरसिंह राजबन्सी, मोतीराम पवार, ज्वालासिंग बावरी, गजानन बैनवाड, बालाजी यादगिरवाड, शेख कलीम, हनुमानसिंह ठाकूर आदींचे कौतुक केले आहे.

दै. पुण्यनगरी दि. 04/05/24

# खून, घरफोडीच्या गुन्ह्यातील फरार आरोपी जेरबंद

**नांदेड :** जिल्ह्यातील एका खून प्रकरणासह अन्य गंभीर गुन्ह्यातील सहभागी आरोपीला जेरबंद करण्यात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला यश आले आहे. या अटक करण्यात आलेल्या फरार आरोपीचे नाव संतोष ऊर्फ चॉकलेट्या बापूराव भोसले ( ४५ रा. कुरुळा ह.मु. वहाद, ता. कंधार जि. नांदेड) असे आहे.

नांदेड जिल्ह्यात घडत असलेल्या गुन्ह्यांना आळा घालावा यासाठी पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी स्थागुशाचे पोलिस निरीक्षक उदय खंडेराय यांना आदेशित केले होते.त्यानुसार खंडेराय यांनी मालाविरुध्दचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पथके स्थापन केली आहेत. या अनुषंगाने माली गुन्ह्यासंबंधाने माहिती घेत असतांना स्थानिक गुन्हे शाखेतील पथकातील अधिकारी यांना खुनाचा गुन्हा व ८ घरफोडीच्या गुन्ह्यातील फरार आरोपी संतोष ऊर्फ चॉकलेट्या बापूराव भोसले ( ४५ रा. कुरुळा ह.मु. वहाद, ता. कंधार जि. नांदेड) हा त्याच्या राहते गावी वहाद (ता. कंधार) येथे असल्याची गुप्त माहिती मिळाली. यावरून पथकाने संतोष ऊर्फ चॉकलेट्या वापुराव भोसले याला ताब्यात घेतले आहे. त्याची कसून चौकशी केली असता त्याने विविध गंभीर गुन्ह्यातील सहभागाची कबुली दिली आहे. मुखेड पोलिस ठाणे,देगलूर पोलिस ठाणे, कंधार पोलिस ठाणे येथे विविध कलमान्वये असलेले गंभीर गुन्हे उघडकीस आले आहेत. आरोपीकडून या गुन्हयातील मुद्देमाल



४८ ग्रॅम सोन्याचे दागिने, २०० ग्रॅम चांदीचे दागिणे व नगदी २१ हजार रुपये असा एकूण ३ लाख ७३ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन आरोपीला तपासकामी मुखेड पोलिस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.संतोषविरुध्द विमानतळ पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल आहे.

पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे,अपर पोलिस अधीक्षक अविनाश कुमार,खंडेराव धरणे यांच्या मार्गदर्शनाखाली खंडेराय, सपोनि रवी वाहुळे, माधव केंद्रे, पोहेकाँ गुंडेराव करले, संजीव जिंकलवाड,देविदास चव्हाण,रणधीरसिंघ राजबन्सी, मोतीराम पवार, ज्वालासिंघ बावरी, गजानन बयनवाड,बालाजी यादगिरवाड,कलीम शेख, हनुमानसिंह ठाकूर यांनी केली.